स्वामीसमर्थसेवेकरी




# || श्रीगुरुचरित्र ||
# अध्याय चौदावा

श्रीगणेशाय नमः ।। नामधारक शिष्य देखा || विनवी सिद्धासी कौतुका ।। प्रश्न करी अतिविशेखा || एकचित्ते परियेसा ||१|| जय जयाजी योगीश्वरा ।। सिद्धमूर्ती ज्ञानसागरा ॥ पुढील कथा विस्तारा ॥ ज्ञान होय आम्हांसी ऐसी ||२|| उदरव्यथेच्या ब्राह्मणासी || प्रसन्न झाले श्रीगुरु कृपेसीं ।। पुढे कथा वर्तली कैसी || विस्तारावें आम्हांप्रती ||३|| ऐकोनी शिष्याचे वचन || संतोषे सिद्ध आपण || गुरुचरित्र कामधेनु जाण ॥ सांगता झाला विस्तारोनि ॥४॥ ऐक शिष्या शिरोमणी ॥ भिक्षा केली त्याचे भुवनी || तयावरी संतोषोनि ।। प्रसन्न झाले परियेसा ॥५॥

गुरुभक्तिचा प्रकार ॥ पूर्ण जाणे द्विजवर ।। पूजा केली विचित्र || म्हणोनि आनंदे परियेसा ॥६॥ तया सायंदेव द्विजासी ॥ श्रीगुरू बोलती संतोषी || भक्त व्हावें वंशोवंशी ॥ माझी प्रीती तुजवरी ॥७॥ ऐकोनि श्रीगुरूंचे वचन || सायंदेव नमन करून ॥ माथा चरणीं ठेवून ॥ नमिता झाला पुनः पुनः ।।८।। जय जयाजी सद्गुरु ।। त्रिमूर्तीचा अवतारू ।। अविद्यामायें दिससी नरु || वेदां अगोचरू तुझा महिमा ||९|| विश्वव्यापक तूंचि होसी ॥ ब्रह्मा विष्णु व्योमकेशी ॥ धरिलें स्वरूप तूं मानवासी ।। भक्तजन तारावया ॥१०॥

तव महिमा वर्णावयासी । शक्ति कैची आम्हांसी ।। मागणे एक तुम्हांसी ॥ कृपा करणे गुरुमूर्ती ॥११॥ माझे वंशपरंपरी ॥ भक्ति द्यावी निर्धारी ॥ इह सौख्य पुत्रपौत्री ॥ अंती

द्यावी सद्गति ॥१२॥ ऐशी विनंती करूनी || पुनरपि विनवी करुणावचनी || सेवा करितो द्वारीं यवनी ।। महाक्रूर असे तो ॥१३॥ प्रतिसंवत्सरी ब्राह्मणांसी ॥ घात करितो जो बहुवसीं ॥ याचि कारणे आम्हांसी ॥ बोलावीतसे परियेसा ॥१४॥ जातां तयाजवळी आपण ॥ निश्वयें घेईल माझा प्राण ॥ भेटी झाली तुमची म्हणोन ॥ मरण कैचे आम्हांसी ॥१५||

संतोषोनि श्रीगुरुमूर्ती ॥ अभय देती तयाप्रती || विप्रमस्तकीं हस्त ठेविती ॥ चिंता न करी म्हणोनिया ॥१६॥ भय सांडूनि त्वां जावें ॥ क्रूर यवनातें भेटावें ॥ संतोषोनि प्रियभावें ॥ पुनरपि पाठवील आम्हांप्रती ॥१७॥ जोवरी परतोनि तूं येसी || असों आम्ही भरंवसीं ।॥ तूं आलिया संतोषी ॥ जाऊं मग येथोनिया ||१८|| निजभक्त आमुचा तूंचि होसी || परंपरी वंशोवंशी ॥ अखिलाभीष्ट तू पावसी || वाढे संतति तुझी बहुत ॥१९॥ तुझे वंशपरंपरीं ॥ सुखे नांदती पुत्रपौत्री || अखंड लक्ष्मी तुझे घरीं ॥ निरोगी शतायु नांदाल ॥२०॥

ऐसा वर लाधोन ॥ निघे सायंदेव ब्राह्मण ॥ जेथें होता तो यवन ॥ गेला त्वरित त्याजवळी ॥२१॥ कालांतक यम देखा ॥ यवन दुष्ट परियेसा ॥ ब्राह्मणातें पाहता कैसा || ज्वालारूप होता झाला ||२२|| विन्मुख होऊनि गृहांत || गेला यवन कोपत ॥ विप्र झाला भयचकित ॥ मनीं श्रीगुरु ध्यातसे ॥२३॥ कोप आलिया ओळंदयासी ॥ केवी स्पर्शे अग्नीसी ॥ श्रीगुरुकृपा असे जयासी ॥ काय करील यवन दुष्ट ॥२४॥ गरुडाचिया पिलीयासी ॥ सर्प कैसा डंसी || तैसी त्या ब्राह्मणासी ।। असे कृपा श्रीगुरूची ॥ २५॥

कां एखादे सिंहासी ॥ ऐरावत केवी ग्रासी ॥ श्रीगुरुकृपा ज्यासी ॥ कलिकाळाचें भय नाहीं ॥२६॥ ज्याचे हृदयीं गुरुस्मरण || भय कैचें तया दारूण || काळमृत्यू न बाधे जाण ॥ अपमृत्यू काय करील ॥ २७॥ ज्यासी नाहीं मृत्यूचे भय ।। त्यासी यवन करील काय ।। श्रीगुरुकृपा ज्यासी होय ।। यमाचें भय नाहीं तया ॥२८॥ ऐसियापरी तो यवन ।। गृहीं निघाला भ्रमेंकरून || दृढ निद्रा लागतां जाण ॥ शरीरस्मरण नाहीं त्यासी ॥ २९॥ हृदयज्वाळा होवोनि त्यासी ।। जागृत होवोनि परियेसीं ।। प्राणांतक व्यथेसी ॥ कष्टतसे तये वेळीं ॥३०॥

स्मरण नसे कांहीं ॥ म्हणे शस्त्र मारितो घाई || छेदन करितो अवेव पाहीं ॥ विप्र एक आपणासी ॥३१॥ स्मरण झालें तये वेळीं ॥ धावत गेला ब्राह्मणाजवळी ॥ लोळतसे चरणकमळीं ।॥ म्हणे स्वामी तूंचि माझा ॥३२॥ तूंतें पाचारिलें येथें कवणी ॥ जावें त्वरित परतोनि ॥ वस्त्रं भूषणें देवोनि || निरोप देत तये वेळीं ॥३३॥ संतोषोनि द्विजवर || आला

ग्रामीं सत्वर ॥ गंगातीरी जाय लवकर ॥ श्रीगुरूचे दर्शनासी ॥३४॥ देखोनिया श्रीगुरूसी ||
नमन करी भावेंसी ॥ स्तोत्र करी बहुवसी ॥ सांगे वृत्तान्त आद्यंत ॥ ३५॥

संतोषोन श्रीगुरुमूर्ति ॥ तया द्विजा आश्वासिती ॥ दक्षिणे दिशे जाऊं म्हणती ॥ स्नान तीर्थयात्रेसी ॥३६॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ विनवीतसे कर जोडून || न विसंबे आतां तुमचे चरण || आपण येईन समागमें ॥३७॥ तुमचे चरणाविणें देखा ॥ राहूं न शके क्षण एका ॥ संसारसागरतारका ॥ तूंचि देवा कृपासिंधू ॥३८॥ उद्धराया सगरांसी ॥ गंगा आली भूमीसी ॥ तैसा स्वामी आम्हांसी || दर्शनें उद्धार आपुल्या ||३९|| भक्तवत्सल तुझी ख्याति ।। आम्हां सांडणें काय नीति || सवेंचि येऊं हें निश्चिती ॥ म्हणोनि चरणीं लागला ॥४०॥

येणेंपरी श्रीगुरूसी ॥ विनवी विप्र भावेंसी ॥ संतोषोनि विनयेंसी || श्रीगुरु म्हणती तये वेळीं ॥४१॥ कारण असे आम्हां जाणें ॥ तीर्थें असती दक्षिणे ।। पुनरपि तुम्हां दर्शन देणें ।॥ संवत्सरीं पंचदशी ।॥४२॥ आम्ही तुमचे ग्रामासमीपत || वास करूं हे निश्चित || कलत्र पुत्र इष्ट भ्रात ॥ तुम्हीं आम्हां भेटावे ॥४३॥ न करीं चिंता असां सुखे ।। सकळ अरिष्टे गेलीं दुःखे ॥ म्हणोनि हस्त ठेवी मस्तकीं ।॥ भाक देती तये वेळीं ।॥४४॥ ऐसेंपरी सांगोनि ॥ श्रीगुरु निघाले तेथोनि ॥ जेथे असे आरोग्यभवानी ॥ वैजनाथ महाक्षेत्र तें ।॥४५।।

समस्त शिष्यांसमवेत || श्रीगुरु आले तीर्थ पहात || प्रख्यात असे वैजनाथ || तेथें राहिले गुप्तरूपें ॥४६॥ नामधारक विनवी सिद्धासी || कारण काय गुप्त व्हावयासी || होते शिष्य बहुवसी ॥ त्यांसी कोठें ठेविलें ॥४७॥ गंगाधराचा नंदन ॥ सांगे गुरुचरित्रवर्णन ॥ सिद्धमुनि विस्तारोन ॥ सांगे नामधारकासी ॥४८॥ पुढील कथेचा विस्तार ॥ सांगतसे अपरंपार || मन करुनि एकाग्र ॥ ऐका श्रोते सकळिक ॥४९॥ वास सरस्वतीचे तीरीं ॥ सायंदेव साचारी || तया गुरूतें निर्धारी ॥ वस्त्रे भूषणें दीधलीं ॥५०॥

गुरुचरित्र अमृत || सायंदेव आख्यान येथ ॥ यवनभयरक्षित ॥ थोर भाग्य तयाचें ॥५१॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने दुष्टयवनशासनं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥१४॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ।। ओवीसंख्या ॥५१॥

।। श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ।।

या सारख्या इतर श्री स्वामी चरित्र सारामृत , अध्याय , आरती संग्रह , स्तोत्र , उपाय मिळवण्यासाठी किंवा जाणूनघेण्यासाठी खालील दिलेल्या लिंक वर क्लिक करा....

।। भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे ।।